पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय.
स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ,प्रेमलोक पार्क,
चिंचवड, पुणे-४११०१९फोन नं.- ०२०- २७३५०४४४,

**-: प्रसिध्दीपत्रक :-**

**पोलीस भरती २०१९ मधील पात्र पुरुष / महिला उमेदवारांकरीता सुचना.**

**दिनांक:- १९/०५/२०२३**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाची पोलीस भरती- २०१९ करीता एकुण ७२० पदांची पोलीस शिपाई भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे. पोलीस भरतीमध्ये उमेदवारांना लेखी परीक्षा व मैदानी चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांनुसार तसेच उमेदवारांचे **सामाजिक व समांतर आरक्षणानुसार प्रतिक्षायादीमधुन दिनांक २७/०६/२०२२ रोजी निवडयादीमध्ये समाविष्ठ करुन तसे या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.**

प्रतिक्षायादीमधून निवडयादीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या उमेदवारांवर दाखल असलेल्या गुन्ह्याचे अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखालील समितीने शासकीय सेवेत समाविष्ठ करणेबाबत मान्यता दिलेली असल्याने तसेच नमुद उमेदवार हे वैद्यकीय तपासणीमध्ये फिट असल्याने खालील नमुद उमेदवार हे पोलीस शिपाई पदाचे नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहे.

खालील नमुद पुरुष/महिला उमेदवारांनी **दिनांक २२/०५/२०२३ रोजी सकाळी १०:०० वा. पोलीस मुख्यालय, निगडी येथे उपस्थित राहावे. सदर दिवशी पोलीस शिपाई या पदाचे नियुक्तीचे आदेश ते कर्तव्यावर हजर झालेनंतर त्यांना अदा करण्यात येणार आहेत.**

| SR NO | CHEST NO | APPLICANT | GENDER | SELECATION |
|---|---|---|---|---|
| 1 | 8568 | MARUTI VITTHAL WANVE | MALE | OPEN_EX |
| 2 | 8620 | MUKUND SHANKAR PAWAR | MALE | OBC_EX |
| 3 | 545 | GANESH PRATAP PATIL | MALE | VJA_SP |
| 4 | 6480 | RUPALI KISAN METE | FEMALE | OPEN_WR |

**पुरुष/महिला उमेदवारांनी उपस्थित राहताना करावयाची कार्यवाही खालीलप्रमाणे.**

१. उमेदवारांनी सोबतचे पत्रकासोबत सादर करण्यात आलेला वैयक्तिक माहितीचा नमुना सुवाच्च अक्षरात अथवा टंकलिखित / संगणकावर भरुन येताना सोबत घेऊन यावा.
२. उमेदवारांनी उपस्थित राहतेवेळी नजीकच्या काळातील पासपोर्ट साईज १२ फोटो सोबत घेऊन यावेत.
३. उमेदवार यांनी हजर होताना मेस ॲग्रिम व गणवेश सरंजामाकरीता पुरेशी रक्कम अंदाजे रुपये ५०००/- सोबत ठेवावी.
४. ज्या उमेदवारांनी स्वतःचे आधार कार्ड व पॅन कार्ड तसेच कुटुंबातील ज्या व्यक्तिचे नामनिर्देशन करणार आहेत त्या व्यक्तिचे आधार कार्ड, पॅन कार्ड, चे छायांकीत प्रती सादर केलेल्या नाहीत. त्यांनी येताना सोबत घेऊन यावे.
५. ज्या उमेदवारांचे पगाराकरीता बँकेमध्ये बचत खाते उघडलेले नाही. त्यांनी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडून बँकेचा खाते क्रमांक व पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स तसेच दोन चेक ( कॅन्सल केलेले ) येताना सोबत आणणे आवश्यक आहे. राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते असल्यास पासबुकची प्रत सोबत आणणे. प्रशिक्षण केंद्रातील मेस वर्गणी व इतर रक्कम वसुली करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रात पाठवितांना त्यांचे ATM Card आणि चेक बुक सोबत असणे आवश्यक आहे.

६. उमेदवार हे प्रशिक्षण केंद्रामध्ये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई म्हणुन रुजू झालेनंतर प्रशिक्षण कालावधीत मध्यांतर ( Mid Term ) देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

७. **उमेदवार हे प्रशिक्षणार्थी म्हणुन प्रशिक्षण** केंद्रामध्ये हजर झालेनंतर त्यांना नैमित्तिक रजा वगळून कोणत्याही प्रकारची रजा मंजुर केली जाणार नाही. तथापि, अपरिहार्य कारणास्तव संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत फक्त ०५ दिवस रजा मंजुर करण्यात येईल. त्या पेक्षा जास्त रजेची आवश्यकता भासल्यासस त्या संबंधित प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण चालू ठेवता येणार नाही व सदर प्रशिक्षणार्थीस मुळ घटकात परत पाठविण्यात येईल यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

८. उमेदवार हे नवप्रविष्ठ पोलीस म्हणून प्रशिक्षण केंद्रामध्ये हजर झालेनंतर त्यांना स्वतःचे लग्न, नातेवाईकांचे लग्न तसेच इतर कार्यक्रमासाठी कोणत्याही प्रकारची रजा मंजून करण्यात येणार नाही याची नोंद उमेदवारांनी घ्यावी.

९. उमेदवारांनी मुलभूत प्रशिक्षणाकरीता आवश्यक असणारे साहित्याची यादी सोबत सादर केलेली आहे. तरी यादीमधील साहित्यासह हजर राहावे.

**( स्वप्ना गोरे )**
**पोलीस उप आयुक्त, मुख्यालय.**
**पोलीस आयुक्तालय, पिंपरी चिंचवड.**